नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४० Issue - 40 | वार - शनिवार दि. ४ जुलै २०२६ Blow- Saturday Date 4 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात ३ ते ७ जुलैं दरम्यान पावसाचा जोर वाढणार

## नदीकाठासह डोंगराळ भागातील लोकांना सतर्क राहावं, हवामान विभागाचा इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील काही भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. तर काही भागात अद्याप म्हणावा तसा पाऊस झा-लेला नाही. मुंबईसह कोकणात आणि विदर्भातील काही भागात चांगला पाऊस कोसळत आहे. दरम्यान, अशातच हवाम ान विभागानं महत्वाची माहिती दिली आहे. महाराष्ट्रात ३ ते ७ जुलै दरम्यान पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

३ ते ७ जुलैदरम्यान राज्यभर पावसाच्या जोरदार सरींचा अंदाज हवाम ान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि घाटमाथ्यावर अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातही ३ ते ७ जुलैदरम्यान काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळध-ार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र ते कर्नाटक किनारपट्टीदरम्यान ऑफ-शोअर ट्रफ सक्रिय आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालं आहे. ते पुढील दोन दिवसांत अधिक प्रभावी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठ, डोंगराळ भाग आणि सखल परिसरातील नागरिकांनी सतर्क रा-हावं असं आवाहन देखील हवामान विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि अनावश्यक प्रवास टाळावा असे आवाहन हवामान विभागानं केलं आहे. चिपळूणमध्ये जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पा-वसामुळं शहरातील सखल भागात पाणी साचलं आहे. दुपारनंतर चिपळूणमध्ये पावसाचा जोर वाढला आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. चिपळूणसह खेड, गुहागर, दापोली भागात जोरदार पाऊस सुरु आहे. नाळिक जिल्ह्यात देखील दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. महिनाभराच्या विश्रांतीनंतर नाशिकच्या कळवण पश्चिम पट्ट्यात पा-वसाने आज जोरदार बँटिंग करत सुरुवात केली. आज झालेल्या दमदार पाऊसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. तर अनेक घराच्या पायरीपर्यंत पावसाचे पाणी शिरलं आहे. पावसामुळे कच्च्या घरच्या भिंती पडण्याची दाट शक्यत निर्माण झाली आहे. दरम्यान, पावसाच्या आगमनाने बळीराजा आनंदला असून पश्चिम पट्ट्यात भात लागवडीसह खरीप पिकांच्या पेरणीला वेग येणार आहे.

# राज्यात 'सेव्ह फूड सेव्ह ड्रग' मोहीम, फार्म टू प्लेटसाठी नियमावली जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढेंच्या करवाईचा धडाका सुरुच असून गेल्याच आठवड्यात त्यांनी हॉटेल व्यवसायिकंसाठी नियमावली सादर करत कारवाईला सुरुवात केली होती. तत्पूर्वी पनीर विक्रेते, बेकरी व्यवसायिकांनाही आपल्या काम ाचा धाक दाखवत भेसळयुक्तांवर कारवाईचा बडगा उगारला होता. आता, दूध सम्राटांकडे त्यांनी आपली नजर वळवली असून तुकाराम मुंढेंचा दूध विक्रेत्यांवर स्ट्राईक केला जात आहे. त्याच अनुषंगाने नियमावली सादर करण्यात आली असून 'सेव्ह फ ुड, सेव्ह ड्रग' ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. ग्राहकांच्या ताटात दूध, दुग्धजन्य पदार्थ पोहोचण्यापर्यंतची निर्बंध स्पष्ट नमूद करण्यात आलं आहे.

राज्यात 'सेव्ह फूड सेव्ह ड्रग' ही मोहीम आता आपण हाती घेतली आहे, आपल्या अन्नात सगळ्यात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे दूध. दूध उत्पादकांची बैठक मी घेतली होती, त्यांना प्रेझेंटेशन दाखवलं असून दूध प्रोडक्ट इकोसिस्टम असली पाहिजे. फार्म टू प्लेट प्रोसिजर आपल्याला बघावी लागेल, असे तुकाराम मुंढेंनी म्हटलं. दुधातली भेसळ, कृत्रिम दूध या सगळ्या संबंधी गाईडलाइन्स दिल्या आहेत. त्यासंदर्भातील आदेश आपण दिले आहेत, दूध उत्पादकांना पॅकर्सपासून सेलर पर्यत ८ प्रकारचे नियम सगळ्यांना लागू आहेत, अशी माहितीही तुकाराम मुंढेंनी पत्रकार परिषदेत दिली. दूध संललन केंद्र, दूध कुलिंग सेंटर, किरकोळ विक्रेते, बल्क दूध विक्री करणारे, पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज, आयस्क्रीम विक्रेते या सगळ्यांना हे नियम लागू असतील, असेही मुंढेंनी म्हटले.

हॉटेल व्यवसायिकांसाठी आपण सुरू केलेल्या मोहिमेत असंही आढळून आलं की, अनेकांनी नियमानुसार बदल केले आहेत. मात्र, काही हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पेस्ट कंट्रोल केलं असं सर्टिफिकेट दाखवतात. मात्र, प्रत्यक्षात पेस्ट कंट्रोल काही हॉटेलमध्ये केलं नव्हतं, त्यांचे लायसन्स रद्द करण्याचे काम आम्ही केलं आहे. त्याम ुळे, मला फक्त सर्टिफिकेट नको आहेत, काम न केल्यास थेट लायसन्स रद्द केले जातील, अशा इशाराच तुकाराम मुंढेंनी दिलाय. महाराष्ट्र शासनाने दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या संपूर्ण पुरवठा साखळीत अन्न सुरक्षा व गुणवत्ता मानकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यव्यापी सर्वकष अनुपालन आदेश जारी केला आहे. हा आदेश दूध संकलन शीतकरण प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक वितरण आणि विक्री या सर्व टप्प्यावर लागू असेल, व्यवसाय, चालकासाठी बंधनकारक आहे, असे तुकाराम मुंढेंनी म्हटले. आद-ेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण वाढ करणे, प्रामाणिक दुध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे. राज्यभर करण्यात आलेल्या तपासण्या, निरीक्षण, नमुना विश्लेषणे अंमलबजावणी कारवाईतून दूध पुरवठा साखळीच्या विविध टप्प्यावर काही गंभीर त्रुटी सातत्याने निदर्शनास आल्या. या त्रुटी केवळ जिल्ह्यापूत्या नाही संपूर्ण पुरवठा साखळीमध्ये एकसमान अनुपालन व्यवस्था आवश्यक आहे, असेही मुंढेंनी म्हटले.

# पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार स्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानच्या दुटप्पी धोरणावर आणि सीमापार दहशतवादाला मिळणाऱ्या पाठिंब्यावर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत.

पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या हद्दीत केलेल्या हवाई हल्ल्यांचा भारताने तीव्र निषेध केला असून, यामध्ये अनेक निष्पाप नागरिक आणि बालकांचा बळी गेल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते जैस्वाल यांनी शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सिंधू पाणी कराराबाबत भारताची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली.

ते म्हणाले, सिंधू पाणी कराराबाबत आमचे धोरण सुसंगत आहे. पाकिस्तानकडून सुरू असलेला सीमापार दहशतवाद आणि या दहशतवादाला मिळण-ारे प्रायोजकत्व पाहता, हा करार अद्याप 'स्थगित' स्थितीत आहे. पाकिस्तानने स्वतःच्या भूमीवरून चालणारा हा दहशतवाद कायम स्वरूपी थांबवला पाहिजे, तरच परिस्थिती सुधारू शकेल.

दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताला जपानचाही भक्कम पाठिंबा मिळाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जप-ानचे पंतप्रधान साना ताकायची यांच्यात झालेल्या द्विपक्षीय चर्चे नंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात, दोन्ही देशांनी पाकिस्तानपुरस्कृत सीमापार दहशतवादाचा निषेध केला आहे. तसेच, लश्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद, अल-कायदा आणि आयएसआयएस यांसारख्या जागतिक दहशतव-ादी संघटनांविरुद्ध कठोर पा-वले उचलण्याचे आवाहन दोन्ही देशांनी जागतिक समुदायाला केले आहे.

**मुसळधार पावसाने राजाराम बंधाऱ्यासह १० बंधारे पाण्याखाली**

# कोल्हापुरात पावसाचा हाहा:कार! पंचगंगेची पातळी २२ फुटांवर; प्रशासन अलर्ट मोडवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस (क्शर्रीं ठरळपषरश्रश्र) कोसळत आहे. धरण क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्या-तील सर्वच नद्यांच्या पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. कोल्हापूरची जीवनवाहिनी असलेल्या पंचगंगा नदीची (झरपलहसरपसर ठळींशी) पातळी सध्या २२ फुटांवर पोहोचली आहे. अवघ्या २४ तासांत पंचगंगा नदीच्या पातळीत प्रचंड वाढ झाली आहे.

नद्यांच्या पाणी पातळीत झालेल्या वाढीमुळे जिल्ह्यातील १० बंधारे पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. यामध्ये राजाराम बंधाऱ्याचा (ठरक्षरीरा इरपवहरीर) देखील समावेश आहे. जिल्ह्यातील राधानगरी, शाहूवाडी, गगनबावडा, भुदरगड, गडहिंग्लज आणि चंदगड या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर सर्वाधिक पाहायला मिळत आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. नद्यांच्या पाणी पातळीत सातत्याने वाढ होत असल्याने, नागरिकांनी नदीकाठच्या भागात जाऊ नये. तसेच, पाण्याखाली गेलेल्या किंवा धोकादायक मार्गावरून कोणत्याही प्रकारची वाहतूक करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

वर्षा पर्यटनाला जाणाऱ्या पर्यटकांसाठी आनंदाची बातमी आहे. कोल्हापूरचा प्रसिद्ध राऊतवाडीचा धबधबा सुरू झाला आहे. राधानगरी तालुक्यातील हा धबधबा पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. पावसाचे आगार समजले जाणाऱ्या राधान-गरी मधला हा धबधबा ५० ते ६० फुटावरून कोसळतो. त्याचे विहंगम दृश्य पाहण्यासारखे असते. सध्या पावसाचा जोर वाढला असून हा धबधबा आता प्रवाहित झाला आहे. या धबधब्याचे तुषार अंगावर झेलत वर्षा पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटक येथे दाखल होतात. आता पर्यटकांची पावलं या धबधब्याकडे वळू लागले आहेत.

दरम्यान, सातारा जिल्ह्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, गेल्या २४ तासांत पश्चिम घाटमाथ्यावर मुसळ-धार पाऊस कोसळला आहे. जिल्ह्याला आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील प्रमुख धबधबे प्रवाहित झाले असून धरणांमध्ये पाण्याची आवक वेगाने वाढत आहे. दरम्यान, दाट धुके आणि दरड कोसळण्याच्या धोक्यामुळे महाबळेश्वर-पोलादपूर जोडणारा आंबेनळी घाट ६ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. महाराष्ट्रात ४ ते ७ जुलैदरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पा-वसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना केले आहे. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन पालिका प्रशासन आणि आ-पत्ती व्यवस्थापन यंत्रणा हाय अलर्टवर ठेवण्यात आली आहे.

मुंबईत पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, गेल्या २४ तासांतही शहरात जोरदार पाऊस झाला आहे. त्यामुळे मुंबई आणि ठाणे जिल्ह्याला आज आणि उद्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय पालघर, रायगड, सातारा तसेच पुणे जिल्ह्यातील घाटमाथा भागालाही रेड अलर्ट देण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



## संपादकीय....

### पावसाचा धुमाकूळ

महाराष्ट्रात ४ ते ७ जुलैदरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर, अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना केले आहे. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन पालिका प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा हाय अलर्टवर ठेवण्यात आली आहे. मुंबईत पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, गेल्या २४ तासांतही शहरात जोरदार पाऊस झाला आहे. त्यामुळे मुंबई आणि ठाणे जिल्ह्याला आज आणि उद्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय पालघर, रायगड, सातारा तसेच पुणे जिल्ह्यातील घाटमाथा भागालाही रेड अलर्ट देण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. धरण क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच नद्यांच्या पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. कोल्हापूरची जीवनवाहिनी असलेल्या पंचगंगा नदीची पातळी सध्या २२ फूटांवर पोहोचली आहे. अवघ्या २४ तासांत पंचगंगा नदीच्या पातळीत प्रचंड वाढ झाली आहे. नद्यांच्या पाणी पातळीत झालेल्या वाढीमुळे जिल्ह्यातील १० बंधारे पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. यामध्ये राजाराम बंधाऱ्याचा देखील समावेश आहे. जिल्ह्यातील राधानगरी, शाहूवाडी, गगनबावडा, भुदरगड, गडहिंग्लज आणि चंदगड या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर सर्वाधिक पाहायला मिळत आहे. नद्यांच्या पाणी पातळीत सातत्याने वाढ होत असल्याने, नागरिकांनी नदीकाठच्या भागात जाऊ नये. तसेच, पाण्याखाली गेलेल्या किंवा धोकादायक मार्गावरून कोणत्याही प्रकारची वाहतूक करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. कोल्हापूरचा प्रसिद्ध राऊतवाडीचा धबधबा सुरू झाला आहे. राधानगरी तालुक्यातील हा धबधबा पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. पावसाचे आगार समजले जाणाऱ्या राधानगरी मधला हा धबधबा ५० ते ६० फुटावरून कोसळतो. त्याचे विहंगम दृश्य पाहण्यासारखे असते. सध्या पावसाचा जोर वाढला असून हा धबधबा आता प्रवाहित झाला आहे. या धबधब्याचे तुषार अंगावर झेलत वर्षा पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटक येथे दाखल होतात. आता पर्यटकांची पावलं या धबधब्याकडे वळू लागले आहेत.

# 'ॲट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व संनियंत्रण समिती बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात 'ॲट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे दिनांक ३ जुलै २०२६ रोजी झालेल्या अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीस माजी सामाजिक न्याय मंत्री व विद्यमान आमदार राजकुमार बडोले, आमदार राजू खरे, खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते.

भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ॲट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यासंदर्भात पोलीस यंत्रणेने या मागील कारणे शोधावीत, याबाबत अधिक खोलवर चौकशी करून गुन्ह्यांचा शोध घेत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास तपासाअंती ते दाखल करण्यात येऊ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणी दरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्हे प्रकारातील साक्षीदारांचे संरक्षण करावे. त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा.

जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करीत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणांची कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्याच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

बैठकीत सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी




सादरीकरण केले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव (विधि व न्याय) दिलीप घुमरे, सचिव (आदिवासी विकास) विजय वाघमारे, अपर पोलिस महासंचालक (नागरी हक्क संरक्षण) अश्विती दोरजे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ व ऑनलाइन पद्धतीने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण आदी उपस्थित होते.

ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत देण्यात आलेली आर्थिक मदत व हेल्पलाईनविषयी माहिती

ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत २०२५-२६ मध्ये ४ हजार ५२४ पीडित व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आली आहे. यापोटी ५३ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच २०२६-२७ मध्ये आतापर्यंत २ हजार ८१ पीडित व्यक्तींना २७ कोटी ४० लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत १४५६६ या हेल्पलाइनवरही तक्रारी स्वीकारण्यात येतात. या हेल्पलाइनवर प्राप्त २८२ तक्रारी १ जून २०२६ पूर्वी निकाली काढण्यात आल्या आहेत.

ही बैठक घेण्यासाठी नॅशनल दलीत मुव्हमेंट फॉर जस्टिस या संघटनेचे राज्य सचिव वैभवजी गिते यांनी सातत्याने मंत्रालय स्तरावर खडतर अथक परिश्रम घेतले. सह्याद्री रेस्ट हाऊस मलबार हिल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून निवेदन दिले. त्यानंतर पुन्हा महाड येथे २० मार्च २०२६ रोजी चर्चा करून १२ मुद्द्यांचे निवेदन दिले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात भेटून मुख्यमंत्री कार्यालयात बैठकीसाठी फाईल पाठवली.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज ३ जुलै २०२६ रोजी विधानभवनात ही बैठक झाली.

परंतु बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशावर संबंधित विभाग कार्यवाही करणार काय?

यापूर्वी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्ये अशा प्रकारचे निर्देश दिले होते परंतु त्या निर्देशांवर आज अखेर पर्यंत कार्यवाही झालेली नाही. ही बाब वैभवजी गिते यांनी याठिकाणी अधोरेखित करीत आहे.

# महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण करून समाजसेवक देवानंद (प्रकाश) नारायणराव शिरसाट यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला/प्रतिनिधी : उल्हासनगर येथील एकनिष्ठ आंबेडकरवादी व समाजसेवक देवानंद उर्फ प्रकाश नारायणराव शिरसाट यांचा वाढदिवस अकोला जिल्ह्यातील येवता गावात सामाजिक बांधिलकी जपत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त क्रांतीसूर्य, शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले यांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला सौ. वंदना देवराव शिरसाट (सरपंच, येवता), गोपाल पाटील (उपसरपंच), मुकीदा पाटील (माजी सरपंच), राष्ट्रपाल सरकटे (तंटामुक्ती समिती अध्यक्ष), भीमजीवन शिरसाट (ग्रामपंचायत सदस्य), गजानन धोत्रे, केशव गांजरे, सम्राट सुरवाडे (पहेलवान, गुडधी), प्रकाश खरात (माजी सरपंच, तिवसा), उषाबाई सुरवाडे (मोठी बहीण, गुडधी), आशाबाई खरात (माजी सरपंच, तिवसा), सेवानंद शिरसाट (मोठे बंधू, येवता), देवराव शिरसाट (केंद्रीय राखीव पोलीस दल - उठझक्र, लहान बंधू, येवता), वंचित बहुजन आघाडीचे उल्हासनगर येथील वरिष्ठ कार्यकर्ते दिवाकर खळे, समाजसेवक संदीप डोंगरे तसेच पत्रकार बाळासाहेब अहिरे यांच्यासह येवता गावातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार आणि उल्हासनगर येथून आलेले अनेक शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी देवानंद (प्रकाश) शिरसाट यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आंबेडकरी चळवळीतील कार्याचे कौतुक केले. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# सैनिक टाकळी येथे दोन ज्येष्ठांचा नव्वदीपूर्ती निमित्त सत्कार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/ संजय चव्हाण : सैनिक टाकळी येथील ज्येष्ठ नागरिक खडू आण्णा दुकानदार आणि बाळीशददा दर्याबाई यांनी वयाची नव्वदी पूर्ण केल्याबद्दल त्यांचा कुटुंबीय, नातेवाईक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी बी .एस.पाटील ,सुधीर पाटील, सुनील पाटील संजय घेवडे, सागर पाटील, अरुण पाटील, हारीशचंद पाटील, विशाल पाटील, नारायण पाटील, संतोष वासकर,कीसनाथ सावंत, तसेच इतर नातेवाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही ज्येष्ठांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला आणि त्यांना निरोगी, आनंदी व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दोन्ही ज्येष्ठांच्या कष्टमय, प्रामाणिक व प्रेरणादायी जीवनप्रवासाचा गौरव करत त्यांच्या अनुभवाचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम अत्यंत आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# विक्रोळी पार्कसाईट मधील त्रिलोक सोसायटी परिसरात मोठे झाड कोसळले; सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज :विक्रोळी पार्कसाईट येथील संजय गांधी नगर परिसरातील त्रिलोक सोसायटीजवळ सतत पडणाऱ्या पावसामुळे काल मोठे झाड अचानक कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झाली नाही. मात्र,झाड कोसळल्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.हा डोंगराळ झोपडपट्टीचा भाग असल्यामुळे येथे लोकवस्ती मोठ्या प्रमाणावर आहे.या धोकादायक झाडाबाबत दोन दिवसांपूर्वीच भाजपचे वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता तसेच शिवसेना महिला वॉर्ड अध्यक्षा पूजा पवार यांनी मनपा 'एन' विभागाला लेखी पत्र देऊन यावर तातडीने कारवाईची मागणी केली होती. मात्र, स्थानिक मनपा एन विभाग प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष



केल्याचे दिसून येत आहे. या घटनेची माहिती मिळताच महेश गुप्ता, पूजा पवार तसेच भाजप पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी घटनास्थळी भेट देऊन संबंधित प्रशासन यंत्रणेला याबाबत तातडीने माहिती दिली. तसेच कोसळलेले झाड त्वरित हटवून परिसरातील नागरिकांची गैरसोय आणि भीती दूर करण्यासाठी मनपा 'एन' विभागाने तातडीने पथक पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अशा घटना टाळण्यासाठी धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, हा परिसर डोंगराळ झोपडपट्टीचा असल्याने स्थानिक आमदार व खासदारांच्या निधीतून विविध ठिकाणी संरक्षक भिंती उभारण्यात आल्या असून त्यामुळे अनेक नागरिकांना संभाव्य दुर्घटनांपासून दिलासा मिळाला आहे. मात्र, काही नागरिक या संरक्षक भिंतींवरच घरे बांधत असल्याने भविष्यात मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेचा विचार करून अशा धोकादायक ठिकाणी बांधकाम टाळावे, असे आवाहन भाजप पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी केले.

# विजय शंकर घनघाव मुंबई कलीयुगातील 'तुकाराम महाराज' - आयएएस तुकाराम मुंढे साहेबांविषयी काही मनोगत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१. भ्रष्टाचाराविरुद्ध लढणारे अधिकारी तुकाराम मुंढे साहेब ज्या-ज्या विभागात जातात, त्या विभागातील बोगस कारभार, गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार उघडकीस येतो. त्यामुळे अनेकजण त्यांना कलीयुगातील तुकाराम महाराज असे संबोधतात.

२. इतर अधिकाऱ्यांबाबत निर्माण होणारा प्रश्न महाराष्ट्रात शेकडो आयएएस अधिकारी कार्यरत आहेत. मग मुंढे साहेब ज्या विभागात जातात, तिथेच एवढे गैरप्रकार का उघड होतात? त्यांच्या आधी त्या पदांवर असलेले अधिकारी नेमके काय करत होते, असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविक आहे.

३. लोकसेवा हाच पदाचा मूळ उद्देश



चझडउ आणि णझडउ या परीक्षा केवळ मोठा पगार, सुख-सुविधा आणि सत्तेचा उपभोग घेण्यासाठी नाहीत. या पदांचा खरा उद्देश म्हणजे लोकसेवा आहे. अधिकाऱ्यांनी हे कधीही विसरू नये.

४. प्रामाणिक अधिकाऱ्याला जनतेचा सन्मान जो अधिकारी प्रामाणिकपणे, निःपक्षपातीपणे आणि कार्यक्षमतेने काम करतो, त्याला जनता डोक्यावर घेते. तुकाराम मुंढे साहेब हे त्याचे उत्तम उदाहरण आहेत.

५. वारंवार बदल्यांचे राजकारण थांबले पाहिजे मुंढे साहेबांच्या सुमारे २१ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक वेळा बदल्या झाल्या आहेत. जनतेच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या विभागात त्यांना किमान ३ ते ५ वर्षे सातत्याने काम करण्याची संधी मिळाली पाहिजे.

६. प्रामाणिक अधिकाऱ्यांना पाठबळ द्या जर एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याला दबावाखाली किंवा राजकीय कारणांमुळे वारंवार बदलीला सामोरे जावे लागत असेल, तर त्याचा परिणाम प्रशासनावर आणि जनतेच्या विश्वासावर होतो.

७. निर्भीड आणि तत्त्वनिष्ठ कार्यपद्धती चुकला की ठोकला ही त्यांची कार्यशैली आहे. कोणाच्याही दबावाला बळी न पडता नियमांनुसार काम करण्याची त्यांची भूमिका अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

थोडक्यात...

आयएएस अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत. त्यांनी जनतेच्या हितासाठी, प्रामाणिकपणे आणि निःपक्षपातीपणे काम केले पाहिजे. तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना सातत्याने काम करण्याची संधी मिळाली, तर प्रशासन अधिक पारदर्शक आणि जनहिताचे होईल.

प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष लोकसेवकांना सलाम!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# 'प्रमाणपत्र नव्हे, प्रत्यक्ष लाभ द्या' ; महिला शेतकऱ्यांसाठी विधानसभेत आ. अभिजीत पाटील यांची ठाम भूमिका



## महिलांना ३ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र निधी आणि प्रत्येक मतदारसंघात समिती स्थापन करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महिला शेतकरी विविध कार्यकारी धोरण विधेयकावर विधानसभेत झालेल्या चर्चेदरम्यान माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांनी महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांची जोरदार मागणी केली. महिलांना केवळ प्रमाणपत्र देऊन थांबू नका, त्या प्रमाणपत्राच्या माध्यमातून प्रत्यक्ष लाभ मिळेल अशी प्रभावी यंत्रणा उभी करा, असे स्पष्ट मत त्यांनी सभागृहात मांडले.

महिला शेतकऱ्यांना ओळख देण्यासाठी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी त्याचा उपयोग केवळ कागदापुरता मर्यादित राहू नये, असे सांगत त्यांनी प्रमाणपत्रधारक महिलांना शासकीय योजनांचा थेट आणि प्राधान्याने लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा निर्माण करण्याची मागणी केली.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कुक्कुटपालन, मत्स्यपालन, चारा लागवड, मधमाशी पालन, जलसंवर्धन, रेशीम उद्योग, गांडूळ खत निर्मिती आणि फलोत्पादन अशा शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी, तसेच महिलांच्या नावावरील प्रकल्पांना शासनाच्या योजनांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशीही त्यांनी भूमिका मांडली.

यावेळी त्यांनी महत्त्वाची आर्थिक मागणी करत सांगितले की, ज्या पद्धतीने शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी पीक कर्जाची सुविधा उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर प्रमाणपत्रधारक महिला शेतकऱ्यांनाही उद्योग उभारण्यासाठी तीन लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात यावे. महिलांना आर्थिक बळ मिळाल्यास त्या स्वावलंबी होतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिला शेतकरी योजनांची माहिती प्रत्येक गावातील महिलांपर्यंत पोहोचावी यासाठी गावोगावी जनजागृती शिबिरे, मार्गदर्शन अभियान आणि विशेष संपर्क मोहीम राबविण्याचीही त्यांनी मागणी केली. अनेक महिलांना शासनाच्या योजनांची माहिती नसल्यामुळे त्या लाभापासून वंचित राहतात, याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक विधानसभा मतदारसंघात लोकप्रतिनिधींच्या सहभागातून स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी. या समित्यांमार्फत योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया अधिक परिणामकारक होईल, असे त्यांनी नमूद केले.

चर्चेच्या शेवटी महिला सक्षमीकरणाचा व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिणाम अधोरेखित करत आ. अभिजीत पाटील म्हणाले, प्रत्येक घरातील महिला सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते. कुटुंब सक्षम झाले तर गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि अखेर देश सक्षम होतो. त्यामुळे महिला शेतकरी विधेयक केवळ कागदावरील घोषणा न राहता प्रत्यक्ष लाभ देणारे ठरले पाहिजे.

> **महिला शेतकरी प्रमाणपत्रासोबत प्रत्यक्ष लाभ देणारी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा उभारावी. कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग, फलोत्पादन आदी आठ शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र निधी द्यावा.**
>
> **प्रमाणपत्रधारक महिला शेतकऱ्यांना उद्योग उभारण्यासाठी ३ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे. महिलांच्या नावावरील प्रकल्पांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य द्यावे. प्रत्येक गावात जनजागृती शिबिरे व मार्गदर्शन अभियान राबवावे.**
>
> **प्रत्येक विधानसभा मतदारसंघात लोकप्रतिनिधींच्या सहभागातून स्वतंत्र समिती स्थापन करून योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवावी.**
>
> **– आमदार अभिजीत आबा पाटील**
> **माढा विधानसभा**

# जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथे युवकाचे आमरण उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




धाराशिव प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : धाराशिव जिल्हाधिकारी येथे २९ जुन पासुन एका कामगार युवकाने आमरण उपोषण चालू केलेले आहे, परंतु आज उपोषणाचा पाचवा दिवस आहे तरीसुद्धा अद्याप पर्यंत कुठल्याही जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याने त्या आमरण उपोषण कर्त्याला भेट दिलेली नाही ही मोठी शोकांतिका आहे.

सविस्तर वृत्त आसे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना केशेगाव या कारखान्यामध्ये सुधीर वाघमारे नावाचा कर्मचारी २०१७ पासुन काम करत आहे, सुधीर वाघमारे यांनी इतर कामगार व कर्मचारी यांच्या काही मागण्या होत्या त्यासाठी सुधीरने मॅनेजमेंटला कळविले होते, परंतु मॅनेजमेंट ने मागण्या मान्य न करता डायरेक्ट सुधीरचे निलंबनच केले, अशा या मॅनेजमेंटचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने चालवणाऱ्या या जातीवादक कारखान्याचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने ताबडतोब पाऊल उचलावे अशी मागणी सुधीर वाघमारे यांनी केली आहे.

कारखान्याच्या कर्मचाऱ्यांच्या पुढील प्रमाणे मागण्या आहेत.

थकीत वेतन तात्काळ अदा करा

कामगारांना टार्गेट करणे थांबवा.

कामगारांच्या हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या कामगारांवरील कारवाईची निष्पक्ष चौकशी करावी.

कामगारांमधील भीतीचे वातावरण दूर करा.

कामगारांच्या घटनात्मक, कायदेशीर व मानवी हक्कांचे संरक्षण करावे.

या व इतर २७ मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांना कारखान दाराच्या विरोधात देण्यात आले आहे.

या उपोषणाला अनेक लोकांनी पाठिंबा दर्शविलेला आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ते के. टी गायकवाड सर, तसेच वंचित बहुजन आघाडीच्या धाराशिव जिल्हा महिला अध्यक्षा अनुराधा ताई लोखंडे यांचा सुद्धा या उपोषण कर्त्याला पाठिंबा दिलेला आहे.

अशाप्रकारे उपोषण करते सुधीर वाघमारे यांच्यावर अन्याय झालेला आहे त्यामुळे शासनाने मला न्याय द्यावा अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय यांना देण्यात आलेले आहे.

# निफाड नगरपंचायत, निफाड वनमहोत्सव सप्ताह दिवस निमित बीजगोळे बनविणे उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत मार्फत आज वनमहोत्सव सप्ताह दिवसाचे औचित्य साधुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निफाड नं २ या शाळेत बीजगोळे (सिडबॉल) बनवीणे हा उपक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्याधिकारी धिरज भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी मोठ्या उत्साहाने बीज गोळे बनवीणे हा उपक्रम राबविण्यात आला. शहरात अधिक झाडे लावणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी हा यामागील उद्देश असून. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माझी वसुंधरा तसेच पर्यावरण विषयक बहुमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापिका . अरुणा महाजन शिक्षक . धर्मेंद्र सोनवणे, सौ. मनीषा कर्डिले, . सुरेखा खैरनार उपस्थित होते.

# माळशिरस नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष रघुनाथ पांडुरंग चव्हाण यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस नगरपंचायत चे नगराध्यक्ष रघुनाथ पांडुरंग चव्हाण यांनी एक जुलै रोजी मुंबई येथील नंदनवन या निवासस्थानी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत अधिकृत पक्षप्रवेश केला. हो माळशिरस तालुक्याच्या राजकारणातील ही एक महत्वपूर्ण घडामोडी मानली जात असून या पक्षप्रवेशामुळे तालुक्यात शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला नवी दिशा मिळेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे रघुनाथ चव्हाण यांच्या जनसामानिसे असलेल्या जोड संपर्क, व संघर्षातून घडलेली नेतृत्व आणि विकासाभिमुख कार्य शैली लक्षात घेता, आगामी ते माळशिरस तालुक्यातील शिवसेनेचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे भक्कमपणे करतील, असा विश्वास पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समर्थकांकडून व्यक्त करण्यात येत आहे नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण यांचा ३ जुलै रोजी वाढदिवस असतो या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेचे शिव धनुष्य हातात घेतलेली आहे...

सामान्य कुटुंबातून आलेले रघुनाथ चव्हाण यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हमालीचे काम करत आपल्या जीवन प्रवासाची सुरुवात केली व कष्ट जिद्द, चिकाटी, आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी समाजात स्वतःची वेगळी स्थान निर्माण केली अथक परिश्रम, जनसंपर्क ,समाजसेवा, आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नासाठी सातत्याने केलेल्या संघर्षाच्या बळावर त्यांनी स्थानिक राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली व सामान्य कार्यकर्त्यापासून नगराध्यक्ष पदापर्यंतची त्यांची वाटचाल ही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

रघुनाथ चव्हाण यांनी केलेली विकास कामे, हो सर्वसामान्य नागरिकांशी कायम ठेवलेला जवळचा संपर्क, व जनहितासाठी घेतलेले निर्णय आणि संघर्षशील नेतृत्वाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी त्यांच्या कार्याची विषयी कौतुक केले व त्यांच्या कामाप्रती असलेले निष्ठा, व जनतेसाठी जी तळमळ

> **वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेचे धनुष्यबाण हातात घेतले.**

आणि नेतृत्व क्षमता पाहून त्यांना शिवसेनेत महत्त्वाची संधी देणे योग्य असल्याचे मत व्यक्त करत आपल्या हस्ते त्यांचे पक्षात मनःपूर्वक स्वागत केले.

पक्षप्रवेशानंतर रघुनाथ चव्हाण यांनी सांगितले की मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या हितासाठी अधिक जोमाने काम करण्याची संधी मिळाल्याचा मला आनंद आहे. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नासाठी आणि शिवसेनेची विचारधारा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी पूर्ण ताकदीने कार्य करत राहील.

या पक्षप्रवेश डोळ्यास शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि विविध मान्यवर उपस्थित होते माळशिरस तालुक्याचे राजकीय घडामोडीमध्ये पक्षप्रवेशांमध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले असून आगामी काळात रघुनाथ पांडुरंग चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याच्या शिवसेनेचे संघटना आणि मजबूत होईल असाही विश्वास कार्यकर्त्याकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# मुबंई मधील शिक्षकांच्या आंदोलनाला स्वेरीच्या डॉ. बी.पी रोंगे सरांची भेट व पाठींबा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : खाजगी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी महाराष्ट्र राज्याच्या शिक्षक समन्वय संघाच्या वतीने मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाला गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी भेट देऊन शिक्षकांचे प्रश्न जाणून घेतले व या आंदोलनाला पाठिंबा दिला.

शिक्षकांनी केलेल्या या आंदोलनात प्रामुख्याने २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के अनुदान घेत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना 'सरसकट' हा शब्द वगळून यापुढील वाढीव टप्पे संच मान्यतेनुसार १ जून २०२६ पासून मिळावेत, त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना २५ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार समान टप्प्यावर अनुदान देण्यासाठी आदेश व्हावे. २०२२-२३ मध्ये शेवटच्या वर्गांची कमी पटसंख्येमुळे अपात्र करण्यात आलेल्या शाळांना संचमान्यता २०२३-२४ किंवा २०२४-२५ च्या संच मान्यतेमधील पदे ग्राह्य धरण्यात येऊन अनुदान देण्यात यावे, तसे शुध्दीपत्रक काढण्यात यावे. पुणे स्तरावर अघोषित असणाऱ्या शाळा व वर्ग तुकड्या अनुदानासह घोषित करण्यात याव्यात, अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती योजना लागू करण्यात यावी, अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांची वयोमर्यादा ५८ वरून ६० वर्षे करणे या व इतर मागण्यांसाठी आंदोलन केले आहे. या आंदोलनाला पुणे विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूकीसाठी अग्रेसर असेलेले उमेदवार व तज्ञ अभ्यासक प्राचार्य डॉ. रोंगे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आंदोलन प्रमुख खंडेराय जगदाळे यांच्याकडून नेमक्या काय मागण्या आहेत त्या जाणून घेतल्या व त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांच्या समवेत विविध पदाधिकारी व शिक्षक तसेच महाराष्ट्र राज्याच्या शिक्षक समन्वय संघाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

### संघटनेचे महत्त्व, ग्राम महसूल अधिकारी पदाच्या जबाबदारीचे गिरवले धडे

# भिवंडी तालुका तलाठी संघाचे मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रामीण महसूल विभागाचे कामकाज अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने भिवंडी तालुका तलाठी संघटनेच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. महसूल विभागातील बदलत्या कार्यपद्धती, शासनाच्या नव्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, डिजिटल प्रणालीचा वाढता वापर आणि नागरिकांना अधिक दर्जेदार व पारदर्शक सेवा देण्याच्या दृष्टीने हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले.

भिवंडी तालुका तलाठी संघटनेच्या शाखेच्या वतीने आयोजित या शिबिरात महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे माजी सरचिटणीस अशोक दुधसागरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून संघटनेचे महत्त्व आणि ग्राम महसूल अधिकारी पदाचे कर्तव्य या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी तलाठी हे शासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचे दुवा असून, बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महसुली कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी त्यांनी महसूल विभागातील बदलते स्वरूप, प्रशासनातील कार्यक्षमता, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, डिजिटल महसूल व्यवस्थापन, नागरिकाभिमुख सेवा आणि कामकाजातील पारदर्शकता यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच तलाठ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत नागरिकांना जलद, अचूक आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहनही त्यांनी केले. शिबिरादरम्यान उपस्थित तलाठ्यांनी महसुली कामकाजाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अनेक व्यावहारिक शंकांचे निरसन करण्यात आले. बदलत्या प्रशासकीय पद्धती, ऑनलाइन सेवा, डिजिटल नोंदी, तसेच भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

या मार्गदर्शन शिबिरामुळे महसूल विभागातील दैनंदिन कामकाज अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य आत्मसात करण्याची संधी तलाठ्यांना मिळाली. सहभागी तलाठ्यांनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही अशाच प्रकारची मार्गदर्शन शिबिरे नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, भिवंडी शाखेचे सचिव निलेश कांबेरे, उपाध्यक्ष संजीव धात्रक, जिल्हा सरचिटणीस सुधाकर कामडी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखडा; जीर्णोद्धार पूर्ण झालेल्या मंदिरांतील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

## दिनांक ४ व ५ जुलै रोजी होणार चार मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार व संवर्धनाची कामे पूर्ण झालेल्या श्री व्यंकटेश मंदिर, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री काशी अन्नपूर्णा मंदिर तसेच कचेरीजवळील श्री मारुती मंदिर येथील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा दि. ४ व ५ जुलै रोजी विधीपूर्वक संपन्न होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

सदरची सर्व कामे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहेत. श्री व्यंकटेश मंदिर हे हेमाडपंथी शैलीतील या मंदिराच्या बाहेरील भिंतींना तडे गेले होते तसेच भिंती बाहेरच्या दिशेने फुगल्या होत्या. त्यामुळे जीर्णोद्धारामध्ये मंदिराची संपूर्ण मोजमापासह नोंद करण्यात आली. प्रत्येक दगडाला क्रमांक देऊन त्याची स्वतंत्र नोंद घेण्यात आली. त्यानंतर स्वाईल बॅग सपोर्ट या तंत्राच्या सहाय्याने दगड काळजीपूर्वक उतरविण्यात आले. चुन्याच्या काँक्रीटचा व दगडांचा मजबूत पाया घालून मूळ दगडांचा वापर करत मंदिराची पूर्ववत पुनर्बांधणी करण्यात आली. पूर्णतः खराब झालेल्या दगडांच्या जागी त्याच













शैलीतील नवीन दगड बसविण्यात आले. विटा व चुन्याच्या दाट पेस्टमध्ये नवीन शिखर उभारून त्यास पर्यावरणपूरक रंग देण्यात आले असून पाणी झिरपू नये म्हणून संरक्षक थर देण्यात आला आहे.

श्री महालक्ष्मी मंदिर या मंदिराच्या मूळ दगडी वास्तूवर आतून टाईल्सचे आवरण व बाहेरील बाजूस रंग देण्यात आल्यामुळे बेसॉल्ट दगडाची नैसर्गिक श्वसनक्षमता (ईशरींहरलळश्रळींू) कमी झाली होती. त्यामुळे जीर्णोद्धारामध्ये टाईल्स काढून ,एअर ब्रेशन तंत्राद्वारे दगडावरील रंग स्वच्छ करण्यात आला. जुनी फरशी काढून नवीन दगडी फरशी बसविण्यात आली. दगडांच्या सांध्यांमध्ये लाईम पॉईटींग करण्यात आले. लाकडी भागांची दुरुस्ती व पॉलिश करण्यात आले. शिखरावरील सिमेंट प्लास्टर काढून त्याजागी चुन्याचा वापर करून पारंपरिक पद्धतीने काम पूर्ण करण्यात आले व पर्यावरणपूरक रंग देण्यात आला आहे.

बाजीराव पडसाळ या परिसरातील तात्पुरते पत्र्याचे छत काढून नैसर्गिक हवा व प्रकाशाचा पुरेपूर वापर होईल तसेच भाविकांना विश्रांतीसाठी आच्छादित जागा उपलब्ध होईल, अशा प्रकारे कायमस्वरूपी हेरिटेज स्वरूपाचे शेड उभारण्यात आले आहे. यासोबत एअर अम्ब्रेशन, लाईम पॉईटींग नवीन दगडी फ्लोअरिंग तसेच संरक्षक कोटिंगची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

कचेरीजवळील श्री मारुती मंदिरालाही जवळील झाडाच्या मुळांमुळे भिंतींना तडे गेले होते व त्या बाहेरच्या बाजूस फुगल्या होत्या. या मंदिराची काळ्या बेसॉल्ट दगडाचा व चुन्याच्या मोर्टारचा वापर करून पुनर्बांधणी करण्यात आली. विटा व चुन्याच्या मोर्टारमधील नवीन शिखर उभारून त्यास पर्यावरणपूरक रंग देण्यात आला. तसेच पावसाचे पाणी झिरपू नये म्हणून संरक्षक दगडी थर देण्यात आला आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत करण्यात आलेल्या या संवर्धन कामांमुळे मंदिरांचा ऐतिहासिक वारसा जपत त्यांचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक ४ व ५ जुलै रोजी होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा विधिवत पार पाडण्यात येत आहे. त्यानंतर सदरची सर्व मंदिरे भाविकांना दर्शनासाठी खुली राहतील असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# हिंगळजवाडीत कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण व वृक्षदिंडीने जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे शिल्पकार स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून हिंगळजवाडी येथे मंगळवारी वृक्षारोपण व वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. कृषी महाविद्यालय आळणीच्या कृषीदूतांनी हा उपक्रम राबवला.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर गावातून वृक्षदिंडी काढण्यात आली. या दिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थी, शेतकरी व ग्रामस्थांनी एक झाड - एक जीवन, झाडे लावा, झाडे जगवा, हरित ग्राम, समृद्ध ग्राम अशा घोषणा देत पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड आणि शेती विकासाबाबत जनजागृती केली.

दिंडीनंतर गावातील सार्वजनिक ठिकाणी वड, पिंपळ, कडुनिंब अशा विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थितांना वृक्षांचे महत्त्व व पर्यावरण संतुलनासाठी वृक्षसंवर्धनाची गरज समजावून सांगण्यात आली.



या उपक्रमात कृषी महाविद्यालय आळणीचे ठथएऽ ळपलहरीसश प्रा. डी.एस. शेटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. इंगळे र.र, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कृषीदूत आदर्श लाटे, सज्जन पडवळ, आशिष नागुलकर, यश मुळे, रोहन शिरसागर, सूरज माने, नीरज पांडव व संदेश मालव यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

स्व. वसंतराव नाईक यांचे कृषी व ग्रामीण विकासातील योगदान स्मरणात ठेवून हा कृषी दिन अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

# किरण गटकांबळे- व्हंताळकर यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**नळदुर्गच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग येथील बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी डॉ. किरण काशिनाथ गटकांबळे- व्हंताळकर यांना यांच्या वतीने पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि कृषी क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. किरण गटकांबळे- व्हंताळकर यांनी सोयाबीन वाणांशी संबंधित अर्बस्क्युलर मायकोरायझल बुरशींचा अभ्यास या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला होता. या संशोधनासाठी त्यांना वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. उद्धव भाले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



मायकोरायझल बुरशी ही वनस्पतींच्या मुळांशी सहजीवन करणारी उपयुक्त बुरशी असून ती वनस्पतींची वाढ, अन्नद्रव्यांचे शोषण आणि रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यास महत्त्वाची भूमिका बजावते. सेंद्रिय शेती व जैविक खतांच्या वापराच्या दृष्टीने या संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

डॉ. किरण गटकांबळे- व्हंताळकर यांचे वडील सेवानिवृत्त प्राध्यापक काशिनाथ गटकांबळे यांनी बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्तप्रिय, अभ्यासू आणि आदर्श शिक्षक म्हणून त्यांची ओळख असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडविण्या बरोबरच आपल्या मुलालाही उच्च शिक्षणासाठी सातत्याने प्रोत्साहन व मार्गदर्शन दिले.

या यशाबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री मधुकरराव चव्हाण ,सचिव उल्हास दादा बोरगावकर, कार्याध्यक्ष रामचंद्र दादा आलुरे, सदस्य तथा नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष शहबाज काजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड प्रा डॉ उद्धव भाले , पत्रकार दादासाहेब बनसोडे यांच्या सह अनेकांनी अभिनंदन व कौतुक केले आहे



# वटपोर्णिमा आणि कृषी दिनाची औचित्य साधून जिजाऊ ब्रिगेडतर्फे वृक्षारोपण निसर्ग संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर टेंभुर्णी, माढा येथे वटपौर्णिमेच्या सणाची औचित्य साधून अनेकदा परंपरेने पूजेसाठी झाडाच्या फांद्या तोडल्या जातात मात्र या प्रतीला फाटा देत निसर्ग संवर्धन एक नवा आणि आदर्श पांडा जिजाऊ ब्रिगेड ब्रिगेडच्या पुणे विभागीय वतीने पाडण्यात आला आहे व झाडाच्या फांद्या न तोडता नवीन झाडे लावा असा महत्त्वपूर्ण विधायक संदेश देत तसेच एक जुलै कृषी दिनाची औचित्य साधून जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर मीनाक्षी अमोल जगदाळे यांनी त्यांच्या टीमच्या वतीने भव्य वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली.

एक जुलै हा दिवस महाराष्ट्रात कृषी दिन म्हणूनही ओळखला जातो व या दिवसाचे आणि वटपौर्णिमेचे महत्त्व एकत्र जपत हा अनुभव उपक्रम आयोजित करण्यात आला होता हे पर्यावरण ढासळत चाललेल्या समतोल राखण्यासाठी केवळ वृक्षारोपण करणे पुरेसे नसून लावलेली झाडे जगवणे आणि तसेच संवर्धन करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे ही बाब या मोहिमेदरम्यान अधोरेखित करण्यात आली. यावेळी परिसरामध्ये विविध देशी वृक्षांच्या रोपाची लागवड करण्यात आली व केवळ रोपे लावून न थांबता उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना या लावलेल्या झाडाचे पुढील काळात संगोपन करणे मी त्यांना जपण्याची जबाबदारी स्वीकारावी असेही सांगितले.

**जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर मीनाक्षी अमोल जगदाळे यांच्या टीमचा स्तुत्य उपक्रम**

सण आणि उत्सव साजरे करताना निसर्गाच्या आणि होणार नाही याची काळजी घेणे याचा काळाची गरज आहे. आणि आपली सामूहिक जबाबदारी आहे. पूजेसाठी झाडाच्या फांद्या तोडून पर्यावरणाचे नुकसान करणे ऐवजी आपण सर्वांनी नवीन झाडे लावा निसर्गाची खरी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शीलाताई पाटील सरांच्या नावाखाली होणारी वृक्षांची हानी थांबून प्रत्येक नागरिकांनी किमान एक तरी झाड लावून ते जगण्याचा संकल्प करावा, असे आव्हान सौ सुवर्णाताई भोसले यांनी यावेळी केले आहे.

या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शीलाताई पाटील, उपाध्यक्ष सुवर्णाताई भोसले संघटक सारिका महाडिक, सौ सुवर्णा सुप्रिया भोसले सौ सविता जगताप सौ कुसुम फाळके सौ. विद्या धनवे तसेच इतर महिला सदस्य उपस्थित होते सर्वांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले व ठीक ठिकाणी झाडे लावली.

जिजाऊ ब्रिगेडच्या पर्यावरण पूरक आणि स्तुत उपक्रम चे सर्व सारातून आणि पर्यावरण प्रेमी नागरिकांतून मोठे कौतुक केले जात आहे विधायक कार्यामुळे समाजासमोर एक अतिशय सकारात्मक अनुकरणीय आदर्श निर्माण झाला आहे.

**शिक्षकांचे शाळा बाह्य कामामुळे विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष, पालकांचा संतप्त सवाल !**

# जिल्हा परिषद शाळा बंद करणार का ... की शिक्षकांना शिकवू देणार !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : विद्यार्थ्यांच्या शिक्षणापेक्षा जर मतदार यादीचे काम अधिक महत्त्वाचे असेल , तर शाळा कशासाठी ? हा प्रश्न आज प्रत्येक पालक , शिक्षक आणि समाजाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे . शाळा बंद करणार का की शिक्षकांना शिकवू देणार ! असा संतप्त सवाल पालकांचा आहे .

भारतीय संविधानाने प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार दिला आहे . मात्र प्रत्यक्षात सरकारी शाळांतील शिक्षकांना वारंवार बीएलओ , मतदार यादी पुनर्रचना , विविध सर्वेक्षणे , जनगणना , निवडणूक कामे आणि इतर अशैक्षणिक जबाबदाऱ्या दिल्या जातात . त्यामुळे वर्गातील अध्यापनाचा वेळ कमी होतो आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

याचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बसतो . श्रीमंत पालक आपल्या मुलांसाठी खासगी शिकवण्या किंवा खाजगी शाळा ही पर्यायी व्यवस्था करू शकतात . परंतू सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षक हाच शिक्षणाचा मुख्य आधार असतो . ३० जून रोजी प्रत्येक शाळेची घंटा वाजली . काही शाळेत शिक्षक हजर होते तर काही शाळेतील शिक्षक शासनाच्या कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी होते . काही जिल्हा परिषद शाळेवर एक किंवा दोन शिक्षक आहेत . जर त्यांना मतदार यादी सर्वेक्षण करण्याचा आदेश असेल तर त्या शाळेला कुलूप दिसेल . जर शाळाच बंद असेल तर आपल्या पाल्याचे काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे . ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या गोष्टीचा सामना करावा लागतो . मध्यमवर्गीय आणि श्रीमंत आपल्या पाल्याला खाजगी स्कूल मध्ये प्रवेश घेण्यासाठी हजारो रुपये खर्च करतात. पण गरीब , शेतकरी , शेत मजूर यांनी आपल्या मुलांना शिक्षण कोठे द्यावे या विचारात चाचपडत आहे . केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या मागील काळात एका वर्गात १०० होती. आज २०२६ ला एक ते चार वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या फक्त सत्तर आहे . यावरून प्राथमिक शाळेची काय स्थिती आहे हे लक्षात येते .

### पालकांच्या मागण्या

शिक्षकांना केवळ अध्यापनाचे काम द्यावे .
अशैक्षणिक कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी .
विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.
शाळेतील प्रत्येक तास विद्यार्थ्यांसाठीच राखून ठेवावा.

### आपला ठाम संदेश

मतदार यादी महत्त्वाचीच आहे, पण विद्यार्थ्यांचे भविष्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे . शिक्षकांना वर्गात राहू द्या, मुलांना शिकू द्या आणि देशाचे भविष्य घडू द्या.

शिक्षक शिकवण्यात व्यस्त असतील तरच शिक्षणाचा दर्जा उंचावेल आणि देशाची भावी पिढी सक्षम बनेल. त्यामुळे शासनाने शिक्षकांवरील अनावश्यक अशैक्षणिक कामांचा तात्काळ पुनर्विचार करून विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे.

– सेवानिवृत्त मु. श्री ए .बि.काळुसे

पाल्य शाळेत गेला की लगेच घरी परत येतो , आमचे शिक्षक हजर नाही . अशाने मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे . यावर शासनाने निर्णय घ्यावा .

– राहुल साबळे, पालक देरेगाव

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जिवन गौरव पुरस्कार पोपट पताडे यांना जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड / प्रतिनिधी : ए.डी.फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य सांगली यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून यात नांदुर नाका पंचवटी नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते पोपट आत्माराम पताडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जिवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा समारंभ सांगली होणार असून .या कार्यक्रमासाठी मा.मंत्री, लोकप्रतिनिधी, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते , अधिकारी यांचे उपस्थित होणार आहे.विविध्द क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तुत्ववान महिला/पुरष यांचा प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.यामध्ये पोपट आत्माराम पताडे यांचा समावेश असुन त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध स्तरांवरुन अभिनंदन करण्यात येत आहे.या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन ए.डी.फाऊंडेशन यांच्याकडून आले आहे.